

भक्त निवास उदघाटन, व्दादश वर्ष पट्टाभिषेक वर्धती उत्सव
व सामुदायिक विवाह सोहळ्यानिमित्त ग्रंथपुष्प

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

# सवर्ण

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

ग्रामदैवत श्री सिध्देश्वर मंदीर, लासीन मठ संस्थान,
वसमत, जि.हिंगोली.

ISBN NO: 978-81-93343692

# अनुक्रमणिका

संपादकीय ....................................................................................................०४

१. शिवागमातील संस्कार — डॉ. अपर्णा जिरवणकर ...........................................०६

२. श्री सिध्दान्तशिखामणीचा मराठीतील आविष्कार — पं.शिवाप्पा खके......................१३

३. श्री सिध्दान्तशिखामणीनुसार आचार्य लक्षणे — प्रा.शशिकांत बसवेश्वर दरगु............१८

४. शिवरहस्य : एक अवलोकन — प्रा.अनिल स्वामी..............................................२१

५. परमरहस्यातील सदाचार: काळाची गरज — सौ. महानंदा खके (कानडे)........................३५

६. मन्मथस्वामींच्या अभंगातील भक्तीदर्शन — प्रा.स्वाती कराळे..............................४९

७. आधुनिक मराठी वीरशैव स्त्रियांचे साहित्य — सौ.प्रा.ज्योती शांतितीर्थ स्वामी...........५२

८. श्री सिध्देश्वर ग्रामदैवत — लासिन मठ — डॉ.सोमनाथ गुंजकर..............................५६

९. श्री लासिन मठाचे वैभव व अनुभव — श्रीमती वत्सलाबाई खाकरे.........................५९

१० वीरशैव परंपरेतील प्राचीन मठ — श्री लासिन मठ — सौ.प्रियंका राजशेखर हिरेमठ.....६१

११. वीरशैवत्वाचा साधा, सरळ सोपा अर्थ — सौ. अंजली शशिकांत दरगु.....................६५

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

श्री सिध्देश्वर ग्रामदैवत लासिन मठ

।। वीरशैव सदृशं मतमस्ति जगत्त्रये।।

डॉ. सोमनाथ गुंजकर

हिंगोली जिल्हयाच्या परिसराला फार प्राचीन वारसा लाभलेला आहे. बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग हिंगोली जिल्हयात औंढा नागनाथ या ठिकाणी आहे. त्याचबरोबर प्राचीन वसुमती आताचे वसमत या ठिकाणी वैभवात भर टाकणारे श्री सिध्देश्वर ग्रामदैवत असलेले लासिनमठ आहे. हे मठ संस्थान प्राचीन ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. इ.स.च्या बाराव्या शतकापासून हे देवस्थान नावारुपाला आलेले आहे. मठातील उपलब्ध साधनावरुन, पुरातन वस्तुवरुन हस्तलिखित संदर्भ ग्रंथावरुन आपल्याला निश्चितपणे सांगता येईल.

स्कंदपुराणाच्या पंधराव्या खंडात सहयाद्री पर्वामध्ये मुळ संस्कृत संहितेत व अंतर्गत वसुमती पुराणामध्ये असे आढळून आले आहे की,'वसुमती हे ठिकाण फार प्राचीन असून त्या परिसरामध्ये देवदानवाची फार पुरातन नगरी होती. 'दक्षिण उत्तर व पूर्व पश्चिम प्रवास करणाऱ्या भाविक लोकांच्या मुक्कामाचे तीर्थक्षेत्राचे ठिकाणी वसुमती नगरी होती. आज नांदेड, परभणी, हिंगोली या तीन जिल्हयाचे हृदयस्थान असलेली प्राचीन वसुमती नगरी दोन ज्योतिर्लिंगाच्या मध्यभागी वसलेली आहे. हयाच वसुमती ठिकाणी श्री सिध्देश्वर मंदिर अशाच परंपरेचा वारसा आजपर्यंत लासिनमठामध्ये आपल्याला दिसून येतो. श्री सिध्देश्वर मठाला अनेक सिध्दी प्राप्त शिवाचार्यांचा वारसा लाभलेला आहे. हे मठसंस्थान सद्धर्म सिंहासनीय, दारुकशाखिय, नंदी गोत्र असलेले उज्जैन–पीठाची शाखा आहे. ह्या मठाचा विकास करण्याचे कार्य पहिले शिवाचार्य श्री १०८ ष.ब्र.१०८ लिंगैक्य ईश्वर शिवाचार्य यांनी केले. जगद्गुरुच्या आज्ञेवरुन आजपर्यंत २४ गुरुंची परंपरा लाभली आहे. सिध्देश्वर मंदिर एकुण तेरा समाधी वसमत येथील मूळ संस्थान मठात उपलब्ध असून काही अन्य शाखामठाच्या शेतामध्ये अस्तित्वात आहेत. वीरशैव लिंगायत परंपरेतील लासिन मठाची ऐतिहासिकता जैन धर्माच्या प्राचीनतेसारखी आहे. कारण २४ तीर्थंकर होऊन गेले. त्यांच्या प्रमाणे मठाची परंपरा २४ गुरुंच्या पावन स्पर्शाने पुनित झाली आहे. आज तरी २४ गुरुंची यादी उपलब्ध नसली तरी, या मठाची २२ वे आचार्य लिंगैक्य करबसव शिवाचार्य, २३ वे आचार्य ईश्वर शिवाचार्य व २४ वे विदयमान ज्ञानपंडित आचार्य ष.ब्र. १०८ करबसव शिवाचार्य यांनी मठाची धुरा सांभाळलेली आहे.

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Estd.1993

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

एखादया व्यक्तीचे जीवन फुलासारखे सुगंधित असते. त्यामुळे मठाच्या परीक्षेत्रात भोवती सुगंध दरवळत असतो, तशी ती व्यक्ती आपल्या परिसरातील उक्ती—कृतीतून अवतीभोवती सदैव प्रसन्नता पेरीत असते. श्री १०८ करबसव शिवाचार्यांच्या सहवासात असाच प्रसन्नतेचा दरवळ अनुभवास येतो. समाजाच्या सूक्ष्म निरिक्षणाने विज्ञानयुगाच्या जाणीवेचे तंतोतंत पालन करुन समाजाच्या विकासासाठी पोषक असते. त्यांच्या सूक्ष्मनिरीक्षणाने सुसंस्कृत वाणीने सदैव समाजाला प्रेमाची सुबोधवाणी, निवेदन शैलीतुन प्रवचनातुन आशीर्वचनातुन सदैव दिसून येते. शिवाचार्य हे उच्च विदयाविभूषित, विज्ञानवादी, तत्त्ववादी, बुध्दीवादी, समतावादी, वीरशैव तत्त्वज्ञानाचे अभ्यासु अनेक विषयामध्ये पारंगत आहेत. त्यांचे वाचन चौफेर आहे. समाजाला प्रबोधन करण्याचे कार्य ते आपल्या अनेक प्रवचनातुन करत असतात. श्री १०८ करबसव शिवाचार्य हे २४ वे शिवाचार्य आहेत. त्यांच्या पट्टाभिषेकाला १२ वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणजे एक तप त्यांनी श्री सिध्देश्वर मंदिराची धुरा सांभाळलेली आहे. म्हणुनच शिवाचार्याविषयी म्हणावेसे वाटते —

धन्य धन्य ही वसुमती नगरी। आज दिन भाग्य उदया आले।।

श्री करबसव शिवाचार्यांच्या । एका तपाचा सोहळा पाहून मन संतोषले।।

श्री १०८ करबसव शिवाचार्यांच्या मार्गदर्शनानुसार मठामध्ये अनेक नवनवीन उपक्रमांची नांदी तयार करण्यात येत असते. या उपक्रमांना समाजातील सर्व जाती धर्माचे लोक सहभागी होत असतात. श्रावण महिन्यामध्ये वसुमती नगरी आनंदाने फुललेली असते. अशा मंगलमय श्रावणामध्ये परमार्थाची पर्वणी म्हणजे सद्गुरु शिवाचार्यांची इष्टलिंगपूजा, श्रावणमास, सप्ताह, प्रवचन इत्यादी धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल श्रावणमासात चालु असते. गुरु पुर्णिमेच्या दिवशी तर भक्तांच्या गर्दीने श्री सिध्देश्वर मंदिर गजबजुन जाते. कारण त्या दिवशीच्या श्री १०८ करबसव शिवाचार्यांच्या अमृतवाणीने भक्तांना मार्गदर्शन होत असते. दिवसभर जिकडे तिकडे भक्तीमय वातावरण निर्माण झालेले पाहून असे वाटते.

चिंतन दिस जाती, ओढ मनाची राहिना।

गुरुपौर्णिमेचा सोहळा, पाहु दयारे एक वेळ।।

असा सोहळा वसमुती नगरीमध्ये अनेक भक्तगण अनुभव घेत असतात, गुरुंच्या आशीर्वादाने अनेक धार्मिक कार्य पार पाडले जातात.

गुरु स्वत्वाची जाण, गुरु श्रध्देचे स्थान।

गुरु असे महान, सकळ जगी।।

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn) Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

श्री १०८ करबसव शिवाचार्य मठाच्या धार्मिक कार्याबरोबर मन्मथ स्वामींच्या पदयात्रेत सहभागी होतात. हजारो भक्तगण शिवाचार्यांच्या सहवासात पायी चालत असतात. या पदयात्रेतून ते एकच संदेश देतात की, भक्तीच्या भावनेने केलेले कार्य सगळयांनाच सारखे मिळत असते. तेथे कोणताही उच्च–निच भेदभाव नसतो. गुरुच्या सहवासात सर्वांना सारखीच अमृतवाणी मिळते म्हणून म्हटले जाते की,

गुरु सामर्थ्य चिती, गुरु तेजाची प्रचिती।

गुरु चैतन्याची सृष्टी, निमित्ताहे।

अविदया, अज्ञान, अंधकार, छेदूनी तात्काळ करी दूर।

तो गुरुशब्द साचार, सूर्या जाणीजे।।

अशा अनेक धार्मिक पर्वणीने श्री सिध्देश्वर मंदिर गजबजून जाते. प्रवचनातून समाजाला आध्यात्मिक वीरशैव लिंगायत तत्वज्ञानाचे अमृत पाजत असतात. अखंड शिवनाम सप्ताह, नवरात्रोत्सव, शिवदीक्षा संस्कार, महात्मा बसवेश्वर जयंती, रक्तदान शिबीर, अशा सर्व कार्यक्रमात कृतीतून ते साध्य करतात. असे समाजाचे प्रबोधन करणारे तत्वचिंतक शिवाचार्य श्री सिध्देश्वर ग्रामदैवत असलेल्या मठाला लाभले हे त्यांच्या शिष्यांचे भाग्यच म्हणावे लागेल.

श्री १०८ करबसव शिवाचार्य हे ज्ञानमूर्ती गुरु असल्याने त्यांचे ज्ञान गगनासारखे विस्तीर्ण आहे. त्यांचे ज्ञान भावाच्या पलीकडे पोहचलेले असल्यामूळे सत्व, रज आणि तम या त्रिगुणांच्या पलीकडे आहे.

जे शुध्द अतिपवित्र, आत्मज्ञानी आहे. स्वआत्म्याची रत आहे. असे असल्यामुळे ते परिपूर्ण निर्भय आहे. नित्य तृप्त व सदा मुक्त आहे. गुरु हा सर्व भक्ताचा शिष्यगणाचा सच्चिदानंद असल्याने तोच सद्गुरु आहे. त्याला नमस्कार करुन त्यानांच आशीर्वाद संपादन करणे हे सर्वोत्तम आहे.

श्री १०८ करबसव शिवाचार्यांच्या तेजोमय व्यक्तीमत्त्वाचे समन्वयशील व्यक्तीमत्त्वाचे यापूढेही परिसर त्यांच्या सहवासाने सुंगधीत व्हावा. दरवळुन जावा ही जगतनिर्मात्याजवळ प्रार्थना. अशा महान शिवाचार्यांना अनंत प्रणाम।

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn) Estd. 1986

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani



श्री करबसय्या गुरु ईश्वरअय्या लासीन मठ, संस्थान

वसमत

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani (M.S.)

Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani